**नि.फौ.ख.क्र. ९४/२०२५**

**सरकार वि. अमोल मोरे**

**निशाणी क्र.३३**

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रमांक १ यांचे सत्यप्रतिज्ञेवर कथन.**

| | |
|---|---|
| माझे नाव | – अर्जुन नवनाथ कोळेकर, |
| माझे वय | – ३२ वर्षे, |
| व्यवसाय | – शेती |
| राहणार | – नांदल, ता.फलटण, जि.सातारा |

**अभियोगपक्षातर्फे सा.क्र.१ चा सरतपास विधीज्ञ श्रीमती एस.एन.वायकर यांचेमार्फत शपथेवर सुरु –**

दि.१७.१२.२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजण्याच्या सुमारास मी शरयु कारखाना बिबी कापशी, फलटण येथे होतो. त्याठिकाणी पंचनामा करण्यात आला होता. सदरचे ठिकाण हे कारखान्याचे राख यार्ड येथे आहे. त्याठिकाणी जे.सी.बी. चोरी संदर्भातील पंचनामा केला होता. त्यावेळी अतुल शिवाजी रासकर यांचा जे.सी.बी. क्र. एम.एच.२०–ए.वाय.–६२८५ हा चोरीला गेला होता. त्याचा रंग पिवळा होता. त्यावेळी पोलिसांनी पंचनामा केला होता. मला घटनास्थळ हे अतुल रासकर यांनी दाखवले होते. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखवण्यात आला. त्यावर माझी पंच म्हणून सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. घटनास्थळ पंचनाम्यास **नि.क्र. ३४** देण्यात येत आहे. त्यावेळी दुसरा पंच हा चेतन जाधव होता.

**सरतपास पुर्ण.**

**आरोपीतर्फे उलटतपास विधीज्ञ श्री. पी.पी.जाधव यांच्यामार्फत शपथेवर सुरु–**

मी अतुल रासकर यांना कारखान्याच्या कामासंदर्भात ओळखतो. मी माझी शेती करतो. मी माझ्या ऊसाच्या संदर्भात कारखान्यावर गेलो होतो. त्यावेळी पोलिसांनी पंचनाम्यासाठी बोलावले. मी कारखान्यात साहेबांना भेटायला गेलो होतो. मला त्या साहेबांचे नाव सांगता येणार नाही. मी ऊस तोडी संदर्भात कारखान्यात गेलो होतो. मला नांदल येथे ५ एकर जमीन आहे. मी एकटाच कारखान्यात गेलो होतो.

चेतन जाधव याला मी ओळखतो. तो माझा मित्र आहे. अतुल रासकर हा

सासवड येथील आहे. त्याची व माझी कारखान्यात ओळख झाली होती. माझे कारखान्यात वरचेवर जाणे येणे असल्याने अतुल रासकर याची व माझी ओळख झाली होती. हे म्हणणे खरे आहे की, चेतन जाधव हा अतुल रासकर यांच्या गावचा आहे. हे म्हणणे खरे आहे की, कारखान्याच्या संपुर्ण परिसरात सि.सी.टी.व्ही. लावलेले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मी ज्या ठिकाणी गेलो होतो, त्याचा गट क्रमांक मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळ पंचनाम्यावरील नकाशाबाबत मला माहिती नाही. मला सांगता येणार नाही की, पंचनाम्यामध्ये कोणता गट क्रमांक लिहिला होता. मला नकाशावरील चतुःसिमा सांगता येतील.

पश्चिम बाजूला कारखान्याची मोकळी जागा आहे. त्याचा गट क्रमांक मला सांगता येणार नाही. राख यार्ड परिसर हा फलटण सातारा रस्त्यापासून अर्धा किमी आत आहे. हे म्हणणे खरे आहे की, कारखान्याकडे जात असताना राखयार्ड परिसर रस्त्याजवळ नाही. मी काय चालले आहे ते पाहण्यासाठी गेलो असताना पोलिसांनी मला बोलावून घेतले. पोलिस त्याठिकाणी काय करत होते हे मला माहित नाही. मला आठवत नाही की, माझ्या आधी चेतन जाधव तेथे होता किंवा काय. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी पंचनामा अगोदरच लिहून ठेवलेला होता. मी कारखान्यावर १०.३० वाजता गेलो होतो. मी ऑफिसमध्ये अर्धा–एक तास होतो व त्यानंतर बाहेर होतो. हे म्हणणे खरे आहे की, पंचनामा मी वाचून पाहिलेला नाही. साक्षीदार सांगतो की, पोलिसांनी त्याला वाचून दाखवला होता. मला लिहिता वाचता येते. हे म्हणणे खरे नाही की, चेतन जाधव यांनी माझ्या समक्ष सही केली नव्हती. आदर्की पोलिस स्टेशन हे घटनास्थळापासून जवळ आहे. मी लोणंद पोलिस स्टेशनला गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनेसंदर्भात लोणंद पोलिस स्टेशनला गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळ पंचनाम्यावरील सहया या लोणंद पोलिस स्टेशनला केल्या आहेत. घटनास्थळावर १० ते २० लोक होते. मला आठवत नाही की, त्यापैकी किती लोक माझ्या ओळखीची होती. मला सांगता येणार नाही की, चेतन जाधव हा मी आल्यानंतर तेथे आला किंवा तो अगोदरच तेथे हजर होता किंवा काय. आज न्यायालयात चेतन जाधव, नवनाथ जगताप व फिर्यादी आले होते. हे म्हणणे खरे आहे की, न्यायालयात

मागील तारखेला आम्ही चौघे एकत्र आलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, आजरोजी आम्ही चौघे न्यायालयाबाहेर उभे होतो.

सन २०२३ मध्ये माझ्या नावे क्षेत्र होते व त्यामध्ये ऊसाची लागवड केली होती हे दाखवणारा पुरावा मी दाखल करण्यास तयार आहे. हे म्हणणे खरे आहे की, ऊसाची तोड करायची असल्यास त्याची लागवडीची नोंद कारखान्यात अगोदर करावी लागते. सदर कारखान्यामध्ये माझ्या ऊसाची नोंद नव्हती.

हे म्हणणे खरे आहे की, राख यार्ड कारखान्याचा परिसर हा रहदारीचा आहे. मला माहित नाही की, राख यार्ड परिसरात सि.सी.टी.व्ही. कॅमेरा आहे किंवा कसे. हे म्हणणे खरे आहे की, राख यार्ड परिसरामध्ये एक वॉचमन आहे. मला माहित नाही की, राख यार्ड परिसरात परवानगी शिवाय जाता येत नाही.

हे म्हणणे खरे नाही की, मी कधीही राख यार्ड परिसरात गेलो नाही व पोलिसांनी माझ्या समक्ष कोणताही पंचनामा केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की,मी व चेतन जाधव यांनी कोणत्याही पंचनाम्यावर सहया केलेल्या नाहीत. जे.सी.बी. क्र. एम.एच.२०–ए.वाय.–६२८५ हा माझ्या पाहण्यातील आहे. नांदल ते सासवड आंतर ६ ते ७ किमी आहे. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीचे व माझे एकमेकांकडे जाणे येणे होते. हे म्हणणे खरे नाही की, मी फिर्यादीच्या सांगण्यावरुन खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

फलटण.
ता.१८.०८.२०२५

(ए.एस.साटोटे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, फलटण.
(न्यायालय क्र.३)

**नि.फौ.ख.क्र. ९४/२०२५**

**सरकार वि. अमोल मोरे**

**निशाणी क्र.३५**

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रमांक २ यांचे सत्यप्रतिज्ञेवर कथन.**

| | |
|---|---|
| माझे नाव | – नवनाथ लहु जगताप, |
| माझे वय | – ३५ वर्षे, |
| व्यवसाय | – शेती |
| राहणार | – सासवड, ता.फलटण, जि.सातारा |

**अभियोगपक्षातर्फे सा.क्र.२ चा सरतपास विधीज्ञ श्रीमती एस.एन.वायकर यांचेमार्फत शपथेवर सुरु –**

दि.१६.१२.२०२३ रोजी संध्याकाळी ६.०० वाजण्याच्या सुमारास मला अमोल रासकर यांचा फोन आला होता. त्यांनी मला सांगितले की, जे.सी.बी. सापडलेला आहे व त्याला आणण्यास जायचे आहे. अमोल रासकर यांना तसा पोलिसांचा फोन आला होता. मी त्यानंतर अमोल रासकर सोबत मौजे पिंप्रद येथे गेलो होतो. सदरचे ठिकाण हे जिल्हा परिषद शाळेच्या मागे मोकळी जागा होती. त्यावेळी पोलिस पिंप्रद येथे हजर होते. सदरचा जे.सी.बी. प्रविण बनकर यांच्या ताब्यात होता. सदर जे.सी.बी. क्र. एम.एच.२०–ए.वाय.–६२८५ असा होता. त्याचा रंग पिवळा होता. पोलिसांनी तो जे.सी.बी. घेतला त्याबाबतचा पंचनामा केला. आता मला जप्ती पंचनामा दाखवण्यात आला. त्यावर माझी पंच म्हणून सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. सदर पंचनाम्यावर **नि.क्र.३६** देण्यात येत आहे.

**सरतपास पुर्ण.**

**आरोपीतर्फे उलटतपास विधीज्ञ श्री. पी.पी.जाधव यांच्यामार्फत शपथेवर सुरु–**

पोलिसांनी माझा जबाब घेतलेला नाही. अतुल रासकर हा माझ्या मित्राचा भाऊ आहे. माझा मित्र अमोल रासकर आहे. आम्ही सर्व एकाच गावातील आहोत. अमोल रासकर व मी जे.सी.बी. घेण्याकरीता गेलो होतो. सदर जे.सी.बी. आदर्की पोलिस स्टेशनला आणला होता. त्यावेळी बनकर पोलिस होते. ते आदर्की पो.स्टेशनला असतात. हे म्हणणे खरे आहे की, पोलिसांचा अमोलला फोन आला होता, मला त्याची वैयक्तीक माहिती नाही. मी अमोलच्या सांगण्यानुसार तेथे गेलो होतो. जे.सी.बी.

ज्याच्याकडून जप्त केला त्याचे नाव प्रविण बनकर आहे. मला त्याचे पुर्ण नाव सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, जे.सी.बी. कोणाकडून घेतला, कोणत्या ठिकाणावरुन घेतला याची मला माहिती नाही. मला सांगता येणार नाही की, कोणत्या तारखेला व कोणत्या वाराला जे.सी.बी. घेतला होता. मला माहित नाही की, अमोल व अतुल रासकर हे तपासी अधिकारी बनकर यांचे नातेवाईक आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मला जे.सी.बी.चा इंजिन क्रमांक व चेसिस क्रमांक सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, पंचनामा माझ्या समक्ष लिहिला आहे. परंतु, त्यात काय लिहिले आहे हे मला माहिती नाही. मला लिहिता वाचता येते. हे म्हणणे खरे नाही की, मी पंचनामा वाचला नव्हता. आता मला पंचनाम्यावरील माझी सही दाखवण्यात आली. हे म्हणणे खरे आहे की, मी पंचनाम्यावर सही आदर्की पोलिस स्टेशन येथे बसून केली होती. त्यावेळी दुसरा पंच याने ही सही केली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रविण बनकर यांना पाहिल्यास ओळखू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी प्रविण बनकर यांना पहिल्यांदा आदर्की पो.स्टेशन येथे पाहिले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्याअगोदर किंवा त्यानंतर मी प्रविण बनकर यांना पाहिलेले नाही.

हे म्हणणे खरे आहे की, आज तारखेला येताना मी, अर्जुन कोळेकर व चेतन जाधव असे एकत्र आलो होतो. मला सांगता येणार नाही की, अतुल रासकर हा आज न्यायालयात आलेला नाही किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, आज न्यायालयाच्या बाहेर मी, अर्जुन कोळेकर, चेतन जाधव व अतुल रासकर असे सर्वांनी कोर्टात काय साक्ष दयावयाची आहे असे ठरवले होते व त्यानुसार साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे आहे की, जे.सी.बी. अमोल रासकरचा नाही. मला सांगता येणार नाही की, अमोल रासकरचा मला कोणत्या तारखेला फोन आला होता.

हे म्हणणे खरे नाही की, दि.१६.१२.२०२३ रोजी जे.सी.बी. सापडला आहे असा अमोल रासकर याचा मला फोन आला होता हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर मी व अमोल रासकर पिंप्रद येथे गेलो होतो, पोलिस तेथे हजर होते, त्याठिकाणी पोलिसांनी प्रविण बनकर याच्या ताब्यातुन जे.सी.बी. जप्त केला

होता हे मी खोटे सांगत आहे.

मला आठवत नाही की, मी अमोल किंवा अतुल रासकर यांच्या सोबत शरयु कारखाना, राख यार्ड परिसर येथे गेलो होतो किंवा नाही. अर्जुन कोळेकर याला मी पाहिलेले नाही, तो माझ्या ओळखीचा नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

फलटण. (ए.एस.साटोटे)
ता.१८.०८.२०२५ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, फलटण.
(न्यायालय क्र.३)